# अभीप्सा

अखिल भारतीय पत्रिका
ऑगस्ट २०२४
वर्ष ४९ अंक ०८

## श्रीमाताजी भारताविषयी





श्रीअरविंद

# अभीप्सा

(ईश्वराप्रति असलेली आस)

**प्रकृती ती जड । करील उघड । ईश्वरी ते रूप । सुघटित ।।**

---

**प्रकाशक**

श्री. प्रदीप नारंग, पुडुचेरी

**प्रकाशन स्थळ**

श्रीअरविंद सोसायटी

सोसायटी हाऊस, ११ सेंट मार्टिन स्ट्रीट, पुडुचेरी – ६०५००१

**संपादक**

डॉ. केतकी मोडक, पुणे

भ्रमणध्वनी : ९४२१०१६०८९

ई–मेल : editorabhipsa2018@gmail.com

**मुद्रक**

सेन्थिल ऑण्डवर प्रेस, पुडुचेरी – ६०५००१

**चिंतनार्थ...**

भारत आधुनिक मानवजातीच्या सर्व समस्यांचे प्रतिनिधित्व करणारा देश झाला आहे. भारत हाच पुनरुत्थानाची भूमी ठरेल. तो अधिक उन्नत आणि अधिक सत्य जीवनाच्या पुनरुत्थानाची भूमी बनेल.

– श्रीमाताजी (CWM 13 : 368)

*

## श्रीमाताजी भारताविषयी

संपादकीय........................................................................०२
भारताचा आत्मा ...............................................................०३
श्रीअरविंद आणि भारत.....................................................०८
दुर्गा स्तवन.......................................................................१५
भारतीयांना संदेश............................................................१९
भारताची अखंडता..........................................................२७

---

## संपादकीय

अखिल सृष्टीसाठी असलेल्या 'दिव्य योजने'मध्ये भारताला मध्यवर्ती भूमिका बजावावी लागणार आहे, हे श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांना ज्ञात होते. परंतु हे घडून येण्यासाठी, म्हणजे भारत जगाला काही गुरुपदेश करू शकेल इतक्या उच्च स्थानी पोहोचण्यासाठी, आधी भारताने त्याच्या आत्म्याचा पुनर्शोध घेतला पाहिजे तसेच भारताचे गतवैभव, त्याची गतकालीन प्रज्ञा आणि शक्ती त्याने पुन्हा एकदा आत्मसात करण्याची आवश्यकता आहे, हे देखील त्यांनी सांगितले आहे. आज भारत एका संक्रमणकाळातून जात असताना भारताच्या भूत, वर्तमान आणि भविष्याविषयी श्रीमाताजींच्या 'दिव्य दृष्टी'ला नेमके काय दिसले होते ते पाहणे रोचक व उद्बोधक ठरावे, असे आहे. 'अभीप्सा' मासिकाचा ऑगस्ट २०२४ चा अंक 'श्रीमाताजी भारताविषयी'... या विचारास वाहिलेला आहे.

संपादक, 'अभीप्सा' मासिक

**

योगी श्रीअरविंद म्हणजे पूर्वाश्रमीचे क्रांतिकारक अरविंद घोष आणि श्रीमाताजी म्हणजे पूर्वाश्रमीच्या मीरा अल्फासा, (फ्रान्स). 'श्रीअरविंद आश्रम' हा भारताच्या पूर्व किनाऱ्यावर पाँडिचेरी येथे आहे.

# भारताचा आत्मा

## भारत काय आहे?

भारत म्हणजे काही नुसती जमीन, नद्या आणि या देशातील पर्वतरांगा नाहीत, किंवा या देशातील रहिवाशांना देण्यात आलेले ते सामूहिक नावदेखील नाही. भारत हे एक जिवंत अस्तित्व आहे, अगदी शिवाप्रमाणे जिवंत. शिवशंकर हा जसा देव आहे तशी भारतमाता ही देवता आहे. आणि जर तिच्या मनात आले तर ती मानवी रूपामध्येदेखील आविष्कृत होऊ शकते.

– श्रीमाताजी (CWM 13 : 372)

*

## ईश्वराने निवडलेला देश

या अखिल निर्मितीमध्ये पृथ्वीचे एक आगळेवेगळे स्थान आहे, कारण इतर कोणत्याही ग्रहाबाबतीत नसलेली एक गोष्ट तिच्याकडे आहे आणि ती म्हणजे तिच्या केंद्रस्थानी असलेल्या चैत्य अस्तित्वामुळे (psychic entity) पृथ्वी उत्क्रांतिमय आहे. त्यातही, विशेषतः भारत हा ईश्वराने निवडलेला देश आहे.

– श्रीमाताजी (CWM 13 : 367)

*

## आध्यात्मिक वारसा

भारत हा एकच असा देश आहे की, जिथे आंतरात्मिक कायद्याचे अधिपत्य चालू शकते आणि ते तसे चाललेच पाहिजे. आणि त्यासाठी सुयोग्य काळ आता येथे आला आहे. दुर्दैवाने, त्याची चेतना परकीय राष्ट्राच्या वर्चस्वामुळे आणि त्याच्या प्रभावामुळे विरूप झाली आहे, परंतु असे असूनदेखील, ज्या भारताकडे एकमेवाद्वितीय असा आध्यात्मिक वारसा आहे, त्या भारतासाठी, आंतरात्मिक कायद्याचे अधिपत्य प्रस्थापित होणे ही एकमेव शक्य अशी मुक्ती असेल.

– श्रीमाताजी (CWM 13 : 370)

*

## खरा ध्वनी

भारतीय भाषांमध्ये 'ॐ' हा उच्चार आहे. अगदी अद्‌भुत ध्वनी आहे तो. भारतीय लोकं त्याविषयी काय म्हणतात तुम्हाला माहीत आहे का? 'परमेश्वरा'ने अनुभवलेल्या या सृष्टीमधील सर्व ध्वनींची समष्टी म्हणजे ॐ हा ध्वनी आहे. ॐ हा ध्वनी म्हणजे त्या 'परमेश्वरा'ला घातलेली साद आहे, अशी त्यांची त्या पाठीमागची संकल्पना आहे, किती अद्‌भुत आहे हे! ते त्याकडे एक प्रतीक म्हणून पाहतात...

आणि नुसते प्रतीक म्हणून नव्हे तर, ते त्याकडे एक ऊर्जा या भूमिकेतूनदेखील पाहतात. एक प्रचंड ऊर्जा.

मी पहिल्यांदा 'ॐ' चा उच्चार ऐकला... कोणी एक बर्नार्ड नावाचा मनुष्य होता. तो भारतात वर्षभर राहिला होता. तो हिमालयात एकटाच एका छोट्याशा झोपडीत राहात असे. त्याला भेटण्यासाठी बरेच योगी येत असत. एक दिवस असाच एक योगी त्याला भेटायला आला होता. तो योगी काही बोलला नाही, फक्त त्याच्या शेजारी बसून राहिला आणि काही वेळाने निघूनही गेला. पण परत जाताना त्या योग्याने त्याला फक्त सांगितले, 'ॐ'

कालांतराने मग बर्नार्ड फ्रान्सला परतला आणि जेव्हा तो भारतातले अनुभव सांगत होता, तेव्हा त्याने ही गोष्ट आम्हाला सांगितली होती. त्यावेळी मला भारताविषयी काहीच माहीत नव्हते आणि जेव्हा त्याने ॐ असा उच्चार केला... (श्रीमाताजी वरून खाली काही येत आहे अशा पद्धतीने त्यांचा हात करून दाखवितात.) अशा प्रकारे एक दिव्य शक्ती अवतरित झाली आणि माझे संपूर्ण शरीर, एवढेच नव्हे तर, अवतीभोवतीची प्रत्येक गोष्ट अगदी असामान्य पद्‌धतीने स्पंदित झाली होती. तो एक प्रकारचा साक्षात्कार होता. प्रत्येक गोष्ट, अगदी प्रत्येक गोष्टच स्पंदित होत होती. आणि तेव्हा मी म्हणाले, ''वा! हा आहे खरा ध्वनी!'' आणि तरीसुद्धा मला त्याविषयी काही, अगदी काहीच माहीत नव्हते. म्हणजे

नमस्कार वाचकहो,

अभीप्सा मासिकातील काही पाने आपल्या अवलोकनार्थ येथे देण्यात आली होती. आपल्याला ह्या अंकातील विषयावरील आणि यासारख्या इतर विषयांवरील श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांचे विचार मराठीत समजून घ्यावयाचे असतील तर, आपण अभीप्सा मासिकाचे वर्गणीदार व्हावे, ही विनंती.

वर्गणीचा तपशील शेजारील पानावर दिला आहे.

– संपादक, अभीप्सा मासिक

## मासिकाचे स्वरूप

श्रीअरविंदांचे बहुतांशी सारे साहित्य मुळात इंग्रजी व बंगाली भाषेत आहे. तर श्रीमाताजी यांचे बहुतांशी वाङ्मय फ्रेंच व इंग्रजी भाषेत आहे. हे दुर्मिळ विचारधन मराठीत आणण्याचे प्रयत्न 'अभीप्सा' या मासिकाच्या माध्यमातून अव्याहतपणे चालू आहेत. पाँडिचेरीहून प्रकाशित होणाऱ्या श्रीअरविंद सोसायटीचे मुखपत्र असलेल्या 'ऑल इंडिया मॅगेझिन' या इंग्रजी मासिकाची मराठी आवृत्ती म्हणजे 'अभीप्सा.' १९७६ पासून हे मासिक नियमितपणे प्रकाशित होत आहे.

### वर्गणी व देणगीचा तपशील

वार्षिक वर्गणी : २०० रू. (१२ अंक)
तीन वर्षाचे दर : ५८० रू. (३६ अंक)
पाच वर्षांचे दर : ९६० रू. (६० अंक)
देणगीदार : ४००० रू.
(देणग्या 80 G अंतर्गत करसवलतीस पात्र आहेत.)

वर्गणी वा देणगीची रक्कम आपण ऑनलाईनदेखील भरू शकता.

### वर्गणी वा देणगी ऑनलाईन भरण्यासाठी बँकेचा तपशील

खातेदाराचे नाव : Sri Aurobindo Society
बँकेचे नाव : Central Bank of India
IFSC Code : CBIN0281354
A/C No. : 1235467709

*

**सूचना :** रक्कम भरल्याची पोहोचपावती व आपला संपूर्ण पत्ता membership@aurosociety.org आणि editorabhipsa2018@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा ही विनंती; म्हणजे आपल्या पत्त्यावर अंक पाठवता येईल.

*

वर्गणीदारांना काही कारणाने अंक उपलब्ध न झाल्यास पुढील क्रमांकावर संपर्क करावा – श्री. गोविंद पोतदार ९३७३७२४५२०

# प्रार्थना आणि मंत्र

जून १९७१ चा काळ. भारताची परिस्थिती दिवसेंदिवस अधिकाधिक गंभीर होत चालली आहे असे उदारदा (श्रीअरविंद आश्रमातील एक साधक) यांनी श्रीमाताजींच्या कानावर घातले. श्रीमाताजी म्हणाल्या की, ''हो, सर्व बाजूंनी विरोधी शक्ती चाल करून येत आहेत असे मला दिसत आहे.'' एक मोठे संकट भारतावर येताना दिसत आहे, असेही त्यांनी सांगितले. (त्यानंतर काही महिन्यातच भारत-पाकिस्तान युद्धाला तोंड फुटले होते.) त्यावेळी उदारदांनी त्यांना विचारले, ''आम्ही काही करू शकतो का?''

श्रीमाताजी म्हणाल्या, ''काही करण्याची वेळ आता हातातून निघून गेली आहे.'' श्रीमाताजींनी त्यांना हेदेखील सांगितले की, मी चोवीस तास परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. तेव्हा उदारदा यांनी श्रीमाताजींकडे अशी प्रार्थना केली की, ''भारताला या बिकट परिस्थितीतून पार होण्यासाठी काही मंत्र किंवा एखादी प्रार्थना आम्हाला द्यावी.'' श्रीमाताजी काही क्षणांसाठी ध्यानावस्थेत गेल्या आणि मग त्यांनी ही प्रार्थना दिली.

"Supreme Lord, Eternal Truth
Let us obey Thee alone and live according to Truth"

त्याचा भावार्थ असा आहे की, ''हे परमेश्वरा, चिरंतन सत्यरूपा, आम्ही केवळ तुझेच अनुसरण करावे आणि केवळ सत्याला धरूनच आम्ही आचरण करावे.'' पुढे जगन्नाथ वेदालंकार यांनी त्याचे संस्कृतमध्ये भाषांतर केले. ''परमोच्च प्रभो सत्य नित्य त्वामेव केवलम् । अनुवर्तामहे सत्यम् अनुजीवाम् केवलम् ।।'' नंतर या निमित्ताने श्री. चंपकलाल यांनी श्रीमाताजींना विचारले की, ''प्रार्थना आणि मंत्र यामध्ये काय फरक आहे?''

श्रीमाताजी म्हणाल्या, ''प्रार्थना ही अंतःकरणातून आलेली असते आणि मंत्र हा मनातून उमटलेला असतो. मंत्रामध्ये एक प्रकारचे स्पंदन असते. त्याद्वारे मानसिक आकलन आणि एक प्रकारचे स्थैर्य येते. आणि प्रार्थनेमध्ये अभीप्सा असते, भावनांना एक वाट करून दिली जाते. या दोन्हींचा समन्वय झाला तर अद्भुत परिणाम दिसून येतात.''

– आधारित (One of the Mother's Children – by Udar)

*

## आजवर दर्शनदिनी देण्यात आलेले संदेश (क्रमशः)

### २४ नोव्हेंबर २००२

आपण 'ईश्वरा'चे पुत्र आहोत आणि
तो जसा आहे तसेच आपणही असायला हवे :
आपण त्या 'ईश्वरा'चा मानवी अंश असल्याकारणाने,
आपणही 'दिव्य' झाले पाहिजे.
आपले जीवन हा एक विरोधाभास आहे,
ज्याची किल्ली 'ईश्वरा'पाशी आहे.

– श्रीअरविंद (CWSA 33-34 : 67)

*

### ५ डिसेंबर २००२

मूर्त रूपात आलेच पाहिजे असे भविष्यकालीन सौंदर्य जगाला दाखवून देण्यासाठी श्रीअरविंद आले आहेत. ते केवळ आशा प्रदान करण्यासाठीच आलेले नाहीत तर, ज्या वैभवाप्रत हे विश्व वाटचाल करत आहे, त्या वैभवाची प्रत्यक्ष ग्वाही देण्यासाठी ते आले आहेत.

हे जग म्हणजे काही एक दुर्दैवी अपघात नव्हे, तर हे जग म्हणजे असे एक नवल आहे, की जे त्याच्या अभिव्यक्तीच्या दिशेने प्रगत होत आहे. या जगाला भविष्यकालीन सौंदर्याच्या खात्रीची गरज आहे. आणि श्रीअरविंदांनी ती खात्री देऊ केली आहे.

– श्रीमाताजी (CWM 13 : 15)

*

### १ जानेवारी २००३

शांती, सर्व पृथ्वीवर शांती.

सर्व जणांची सामान्य चेतनेमधून मुक्तता होऊ दे आणि त्यांची भौतिक गोष्टींमधील आसक्तीपासून सुटका होऊ दे. हे परमेश्वरा, तुझ्या दिव्य उपस्थितीच्या ज्ञानाप्रत ते जागृत होऊ देत, त्यांना तुझ्या परमचेतनेशी एकीकृत करून घे आणि त्यातून उदयाला येणाऱ्या शांतीच्या समृद्धीची गोडी त्यांना चाखता येऊ दे.

– श्रीमाताजी (CWM 01 : 74)

*